**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी</u>**
मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :–

**माझे नाव** : **शितल दिपक पवार**,
वय : ३३ वर्षे, व्यवसाय : घरकाम,
राहणार : खडकी, जि.पुणे.

**<u>शपथेवर सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री.डी.एल. वाडेकर</u> :**

मयत दिपक पवार हे माझे पती होते व ते ॲम्युनेशन फॅक्ट्री, खडकी, पुणे येथे नोकरीला होते. मी संतोष चव्हाण यांना ओळखते कारण ते माझे नंदोई आहेत.

२. दि.२३/०६/२०२४ रोजी आमचे सर्व कुटुंबिय जामखेड येथे आले होते. त्यानंतर माझे पती दिपक हे पुणे येथे नोकरी निमित्त जामखेडवरून ट्रॅव्हल्स मधुन जाण्याकामी त्याचदिवशी म्हणजे दि.२३/०६/२०२४ रोजी निघाले होते. त्यानंतर दि.२४/०६/२०२४ रोजीच्या सकाळी अंदाजे ०४.०० ते ०५.०० वाजताचे दरम्यान माझे चुलत नातेवाईक संतोष चव्हाण यांचेकडुन आम्हाला कळाले की, रुईछत्तीसी या ठिकाणी माझे पतीचा अपघात झाला आहे व त्यांना दवाखान्यात नेले आहे. त्यानंतर सर्व नातेवाईक आमच्याच घरी येवु लागले. त्यानंतर थोडयावेळाने माझे पतीचा मृतदेह हा ॲम्ब्युलन्समध्ये आमच्या जामखेड येथील घरी आणण्यात आला. त्यानंतर माझे पतींचा अंत्यसंस्कार करण्यात आला. मला नंतर कळाले होते की, माझे पती ज्या ट्रॅव्हल्समधुन जात होते ती ट्रॅव्हल्स खुप जोरात जात होती व तिची धडक रस्त्यावर समोर असणा–या ट्रकला बसली होती व त्यात माझे पतीचा अपघाती मृत्यु झाला होता. सदर ट्रॅव्हल्स चालकाचे नाव अर्जुन सातपुते असल्याचे मला समजले होते. त्यानंतर पोलीसांनी माझेकडे चौकशी करून माझा जबाब नोंदविला होता.

सरतपास पुर्ण.

**शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे त्यांचे वकील श्री.पी.के. भोसले :**

३.    हे म्हणणे खरे नाही की, मी हे खोटे सांगत आहे की, माझे पती हे ट्रॅव्हल्समधुन घटनेच्या दिवशी प्रवास करत होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा अपघात मी प्रत्यक्ष पाहिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

(न्यायालयात साक्षीदारासमक्ष असणा–या स्क्रीनवर साक्षीदाराचा संपुर्ण जबाब हा साक्षीदाराला वाचुन दाखविण्यात आला व त्याने त्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे सरकारी वकीलांसमक्ष तोंडी सांगितले.)

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.09.10 17:20:19 +0530

**(एस.आर. शिंदे)**

**दि.१०/०९/२०२५**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१८, अहमदनगर.